दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ०६ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १०७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### अमेरिकेत इंग्रजी भाषेच्या अटीवर 28 हजारांहून अधिक स्थलांतरित ट्रकचालकांचे परवाने रद्द

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत 28 हजारांहून अधिक स्थलांतरित ट्रकचालकांचे व्यावसायिक वाहनचालक परवाने रद्द करण्यात आले आहेत. व्हाइट हाऊसच्या प्रेस सचिव कॅरोलिन लेव्हिट यांनी मंगळवारी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ट्रम्प प्रशासनाने या व्यावसायिक ट्रकचालकांचे परवाने निलंबित केले असून, त्यांच्या जागी लष्करातील माजी सैनिकांना संधी देण्यासाठी विशेष कार्यक्रम सुरू केला आहे. ट्रम्प प्रशासनाने राज्य सरकारांच्या सहकार्याने 9,500 ड्रायव्हिंग स्कूल बंद केल्याचीही माहिती दिली आहे.

### विदेशी पत्रकारांवर पाकिस्तानचे नवे निर्बंध; शहराबाहेर वृत्तांकनासाठी पूर्वपरवानगी अनिवार्य

**इस्लामाबाद :** पाकिस्तानने देशात वृत्तांकन करणाऱ्या परदेशी पत्रकार आणि माध्यम प्रतिनिधींसाठी नवे मार्गदर्शक नियम जारी केले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने जारी केलेल्या नव्या नियमांनुसार, इस्लामाबाद, लाहोर आणि कराची वगळता इतर कोणत्याही शहरात वृत्तांकनासाठी जाण्यापूर्वी सर्व परदेशी पत्रकार आणि माध्यम प्रतिनिधींना अनापत्ती प्रमाणपत्र (एनओसी) घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीर (पीओके)मध्ये मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर हे नवे नियम लागू करण्यात आले असून, या आंदोलनांकडे जगभराचे लक्ष वेधले गेले आहे.

## थोडक्यात वार्ता

### जम्मू-काश्मीरमध्ये हाय अलर्ट; अमरनाथ यात्रेला तात्पुरती स्थगिती

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटविण्यात आल्याच्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त बुधवारी कडक सुरक्षा व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अमरनाथ यात्रेचा जम्मूतील बेस कॅम्पमधून होणारा प्रवास एक दिवसासाठी स्थगित करण्यात आला आहे. प्रशासनाने भगवतीनगर येथील जम्मू बेस कॅम्पमधून अमरनाथ यात्रा एक दिवसासाठी स्थगित करण्यामागील कोणतेही ठोस कारण जाहीर केले नसले, तरी सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार, सध्याची सुरक्षा परिस्थिती लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी जम्मू बेस कॅम्पमधून पहलगाम (अनंतनाग जिल्हा) आणि बालटाल (गांदरबल जिल्हा) येथील बेस कॅम्पकडे जाणाऱ्या कोणत्याही नव्या यात्रेकरूंच्या तुकडीला परवानगी देण्यात आलेली नाही. अधिकृत सूत्रांनी सांगितले की, जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावर (NH-44) सुरक्षा दलांच्या ताफ्यांची वाहतूकही तात्पुरती थांबवण्यात आली आहे. सुरक्षा यंत्रणांना या महत्त्वाच्या मार्गावरील हालचाली कमीत कमी ठेवायच्या असतील, तेव्हा अशा प्रकारचे पाऊल उचलले जाते. हा महामार्ग काश्मीरला देशाच्या इतर भागांशी जोडणारा वर्षभर खुला राहणारा प्रमुख मार्ग आहे.

### 'बांगलादेशातील उठाव हे नियोजित सत्तांतर' : शेख हसीना

**नवी दिल्ली :** बांगलादेशात २०२४ मध्ये झालेल्या निदर्शनानंतर शेख हसीना यांनी पंतप्रधान पदाचा राजीनामा देत बांगलादेशातून पलायन केलं होतं. तेव्हापासून शेख हसीना या भारतात असल्याचं सांगितलं जातं. गेल्या दोन वर्षांच्या कालावधीत शेख हसीना या एकदाही सार्वजनिकरीत्या समोर आलेल्या नाहीत. तसेच काही दिवसांपूर्वी शेख हसीना यांनी आपण डिसेंबरमध्ये मायदेशी परतणार असल्याचंही सांगितलं होतं.

गेल्या दोन वर्षांनंतर आता पहिल्यांदाच शेख हसीना यांनी दिल्लीत व्हर्च्युअल पद्धतीने सार्वजनिकरीत्या माध्यमांशी संवाद साधला. यावेळी शेख हसीना यांनी बांगलादेशात २०२४ मध्ये झालेल्या उठावाबाबत आणि त्यांच्या बांगलादेशात परतण्याबाबतच्या संभाव्य निर्णयावर भाष्य केलं. 'बांगलादेशातील उठाव हे नियोजित सत्तांतर होतं, विद्यार्थ्यांचं आंदोलन नव्हतं', असं वक्तव्य शेख हसीना यांनी केलं. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं.

### हैबतपूर येथे बालविवाह रोखला

गंगापूर दि.५: गंगापूर तालुक्यातील हैबतपूर येथे अल्पवयीन मुलीचा बालविवाह होणार असल्याची माहिती मिळताच गंगापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पाटील यांना तत्काळ घटनास्थळी धाव घेत बालविवाह रोखला. हैबतपूर येथे अल्पवयीन मुलीचा विवाह आयोजित करण्यात आल्याची माहिती पोलीस पाटील यांना मिळाली होती. माहितीची गांभीर्याने दखल घेत पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांनी आपल्या पथकाला तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार गंगापूर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून संबंधित कुटुंबीयांशी चर्चा केली. पोलिसांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहिती देत अल्पवयीन मुलीचा विवाह लावून न देण्याबाबत समज दिली. तसेच मुलीचे वय निश्चित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. पोलिसांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे होणारा बालविवाह थांबविण्यात यश आले. अल्पवयीन मुला-मुलींचे विवाह होत असल्याची माहिती नागरिकांना मिळाल्यास त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.- पोलीस निरीक्षक सलीम चाऊस

# मनपा झोपेत... पोलिस रस्त्यावर! : मध्यवर्ती बसस्थानकासमोरील खड्डा अखेर वाहतूक पोलिसांनी बुजवला; निरीक्षक मंगेश जगताप यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर




खड्ड्यांत हरवले शहराचे रस्ते; प्रशासनाची उदासीनता पुन्हा उघड
मध्यवर्ती बसस्थानकासमोरील महाखड्ड्यामुळे अपघाताचा धोका वाढला; दररोज हजारो नागरिकांचा जीव मुठीत धरून प्रवास


**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील रस्त्यांची जबाबदारी महानगरपालिकेची, पण ती पार पाडावी लागली वाहतूक पोलिसांना! मध्यवर्ती बसस्थानकासमोरील धोकादायक महाखड्ड्याबाबत अनेक दिवस मनपाकडे पाठपुरावा करूनही कोणतीही कारवाई झाली नाही. अखेर नागरिकांच्या जीविताची काळजी घेत वाहतूक पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांनी सामाजिक कार्यकर्ते रशीद शेख यांच्या सहकार्याने स्वतः खड्ड्यात खडी टाकून तात्पुरती दुरुस्ती केली. या घटनेने मनपाच्या निष्क्रिय कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पुढाकार घेणाऱ्या वाहतूक पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

शहरात काही दिवसांच्या पावसानेच रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. कालच हिंदू प्रकाशवार्ता या वृत्तपत्राने मध्यवर्ती बसस्थानकासमोरील धोकादायक महाखड्ड्याबाबत वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र बातमी प्रसिद्ध होऊनही महानगरपालिकेच्या यंत्रणेने या गंभीर समस्येकडे दुर्लक्षच केले. परिणामी, अखेर वाहतूक पोलिसांनाच रस्त्यावर उतरून मनपाचे काम करावे लागले.

मध्यवर्ती बसस्थानकासमोरील डिव्हायडरमध्ये पाणीगळती सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साचत होते. त्यामुळे रस्त्याचा मोठा भाग खचून महाखड्डा निर्माण झाला. या मार्गावरून दररोज हजारो एसटी बस, शहर बस, रिक्षा, दुचाकी, चारचाकी आणि मालवाहू वाहने ये-जा करतात. बसस्थानक, रेल्वेस्थानक आणि जालना रोडकडे जाणारा हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग असल्याने येथे कायम वाहतुकीची वर्दळ असते.

### "नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची; मनपाने कायमस्वरूपी उपाय करावा" : वाहतूक पो.नि.मंगेश जगताप

**"मध्यवर्ती बसस्थानकासमोरील खड्ड्यामुळे सातत्याने अपघात होत होते. डिव्हायडरमधील पाणीगळतीमुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली होती. याबाबत अनेक वेळा महानगरपालिकेला कळविले, मात्र दुरुस्ती झाली नाही. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून रशीद शेख यांच्या सहकार्याने खड्ड्यात खडी टाकून तात्पुरती व्यवस्था केली. ही कायमस्वरूपी उपाययोजना नाही. महानगरपालिकेने तातडीने पक्का रस्ता करून शहरातील सर्व धोकादायक खड्डे बुजवावेत."**

खड्डा चुकवताना दुचाकीस्वार घसरत होते, वाहनचालकांना अचानक दिशा बदलावी लागत होती आणि रुग्णवाहिकांसह इतर वाहनांनाही मोठा अडथळा निर्माण होत होता. अनेक किरकोळ अपघातही या ठिकाणी घडल्याची माहिती स्थानिकांनी दिली. तरीही महानगरपालिकेकडून केवळ पाहणी आणि आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. वाहतूक पोलीस निरीक्षक मंगेश जगताप यांनी या धोकादायक परिस्थितीची वारंवार मनपाला माहिती दिली. मात्र प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने त्यांनी सामाजिक कार्यकर्ते रशीद शेख यांच्या मदतीने स्वतः खडी आणून खड्डा भरून वाहतुकीसाठी तात्पुरती व्यवस्था केली. या उपक्रमामुळे वाहनचालकांना काहीसा दिलासा मिळाला असून, "कर्तव्यापलीकडे जाऊन नागरिकांसाठी काम करणारे अधिकारी" म्हणून जगताप यांचे नागरिकांनी कौतुक केले.

दरवर्षी रस्ते दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो. तरी पहिल्याच पावसात रस्ते उखडणे, खड्डे पडणे आणि त्याकडे प्रशासनाने कानाडोळा करणे, हा प्रकार आता नित्याचाच झाला आहे.

कालच्या वृत्तानंतरही मनपाकडून कोणतीही तातडीची कारवाई झाली नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांचा जीव धोक्यात असताना महानगरपालिका मौन बाळगते आणि अखेर पोलिसांना रस्ते दुरुस्त करण्यासाठी पुढे यावे लागते, ही शहरासाठी अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत. आता तरी मनपाने कायमस्वरूपी दर्जेदार रस्ता तयार करून शहरातील सर्व खड्डे तातडीने बुजवावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

# सुप्रीम कोर्टातील न्यायाधीशांची संख्या वाढविणारे विधेयक राज्यसभेत मंजूर

**नवी दिल्ली :** राज्यसभेने बुधवारी विरोधकांच्या सभात्यागाच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या 33 वरून 37 करण्यासंबंधीचे सर्वोच्च न्यायालय (न्यायाधीश संख्या) सुधारणा विधेयक, 2026 ध्वनिमताने मंजूर केले. यापूर्वी लोकसभेनेही या विधेयकाला मंजुरी दिल्याने संसदेची अंतिम मंजुरी पूर्ण झाली असून, हे विधेयक 16 मे 2026 रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशाची जागा घेणार आहे.



विधी व न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी चर्चेला उत्तर देताना सांगितले की, न्यायपालिकेतील सुधारणा गतीमान करणे आणि प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. चार नवीन न्यायाधीशांच्या नियुक्तीमुळे सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या 37 झाली असून, सरन्यायमूर्तींसह एकूण संख्या 38 वर पोहोचली आहे. मेघवाल यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता न्यायाधीशांची संख्या वाढविणे ही काळाची गरज होती. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनीही पंतप्रधानांना पत्र लिहून नव्या प्रकरणांच्या वाढत्या ओघामुळे अतिरिक्त न्यायाधीशांची आवश्यकता व्यक्त केली होती. संविधान पीठाच्या सुनावण्यांमुळे नियमित प्रकरणांसाठी उपलब्ध न्यायाधीशांची संख्या अपुरी पडत असल्याने सरकारने अध्यादेशाद्वारे तातडीने 4 न्यायाधीशांची नियुक्ती केली.

त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यावर्षी जानेवारीअखेर सर्वोच्च न्यायालयात 92 हजार 101 प्रकरणे प्रलंबित होती. गेल्या वर्षी 2025 मध्ये 65 हजार 615 प्रकरणांचा निपटारा झाला, मात्र त्याच कालावधीत 75 हजार 410 नवी प्रकरणे दाखल झाली. प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, त्यासाठीच न्यायाधीशांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मेघवाल यांनी सांगितले की, न्यायालयांमध्ये सर्वाधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी विशेष खंडपीठे स्थापन करण्यात आली आहेत. तसेच, ई-कोर्ट मिशनद्वारे न्यायालयीन कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी 7 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

महिला न्यायाधीशांच्या वाढत्या सहभागाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, काही उच्च न्यायालयांमध्ये महिला मुख्य न्यायाधीश कार्यरत असून, लवकरच देशाला पहिल्या महिला सरन्यायाधीश मिळण्याची शक्यता आहे. न्यायपालिकेची स्वायत्तता कायम राखण्यास सरकार पूर्णपणे वचनबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे मार्गासाठी अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती

**मुंबई :** पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मार्गामुळे नारायणगावजवळील खोडद येथील अत्यंत संवेदनशील 'जाएंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' (जीएमआरटी) या दुर्बिणीवर होणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक व तांत्रिक परिणामांचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने उच्चस्तरीय तज्ज्ञ समितीची स्थापना केली आहे. भारताच्या अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली ही चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून, पुढील ६० दिवसांत अभ्यास करून राज्य सरकारला सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे हा राज्य शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. मात्र, विस्तृत प्रकल्प अहवालानुसार (डीपीआर) प्रस्तावित असलेला मूळ मार्ग खोडद येथील जीएमआरटी सुविधेच्या अतिशय जवळून जात होता. या मार्गावरील हायस्पीड रेल्वे वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या विद्युत-चुंबकीय लहरींमुळे जीएमआरटीच्या संवेदनशील खगोलीय निरीक्षणांना आणि संशोधनाला मोठा फटका बसू शकतो, अशी चिंता केंद्र सरकारच्या अणुऊर्जा विभाग तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने व्यक्त केली होती.

यानंतर रेल्वे मंत्रालयाने अहिल्यानगर आणि शिर्डीमार्गे सुधारित मार्ग अंतिम केला होता. परंतु, या नवीन मार्गामुळे प्रवासाचा वेळ वाढत असल्याने, मूळ मार्गावरच बोगदे किंवा उन्नत मार्ग यांसारख्या तांत्रिक उपायांचा अवलंब करून तो वापरता येईल का, याबाबत सातत्याने मागण्या होत होत्या.

या पार्श्वभूमीवर जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक संशोधनाची हानी न होऊ देता सुवर्णमध्य काढण्यासाठी राज्य सरकारने या तज्ज्ञ समितीची नियुक्ती केली आहे.

### राहुल गांधी संसदचे कामकाज चालू देत नाहीत : गौरव भाटिया

**नवी दिल्ली :** राहुल गांधी संसदचे कामकाज चालू देत नाहीत आणि लोकशाही जबाबदाऱ्यांचे पालन करण्याऐवजी ते सातत्याने बेजबाबदार वक्तव्ये करत आहेत. असे भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी सांगितले. या वेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाने 5 ऑगस्ट 2019 रोजी कलम 370 हटविण्याच्या सातव्या वर्धापन दिनाला देशासाठी "गौरवाचा क्षण" असल्याचे सांगत काँग्रेस आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर तीव्र टीका केली. भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत प्रवक्ते गौरव भाटिया यांनी सांगितले की, 5 ऑगस्ट 2019 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संविधानात तात्पुरती तरतूद म्हणून समाविष्ट करण्यात आलेले कलम 370 रद्द करण्यात आले, ज्यामुळे संविधानाच्या मूळ भावनेचा सन्मान झाला. त्यांनी सांगितले की, तत्कालीन गृहमंत्री अमित शाह यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या इच्छाशक्तीचा परिचय देत हा ऐतिहासिक निर्णय लागू केला.

# डाबर इंडियाला FSSAI चा मोठा दणका! '100% शुद्धतेचे' दावे करणाऱ्या मध, तुपासह अनेक उत्पादनांच्या विक्रीवर बंदी

**नवी दिल्ली :** ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि दाव्यांविरोधात भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (FSSAI) आक्रमक भूमिका घेतली आहे. अन्न नियामकाने प्रसिद्ध एफएमसीजी (FMCG) कंपनी 'डाबर इंडिया'वर (Dabur India) कठोर कारवाई करत, लेबलवर '१००%' असल्याचा दावा करणाऱ्या त्यांच्या विविध खाद्य उत्पादनांची विक्री तत्काळ थांबवण्याचे कडक निर्देश दिले आहेत. FSSAI च्या या धडक कारवाईमुळे डाबरच्या मध, गाईचे तूप, नारळाचे दूध यांसारख्या अनेक प्रमुख उत्पादनांना मोठा फटका बसला आहे.

'१००%' दावे ठरले दिशाभूल करणारे

FSSAI ने दिलेल्या माहितीनुसार, डाबर कंपनी आपल्या उत्पादनांच्या पॅकेजिंगवर आणि जाहिरातींमध्ये '१००%' शुद्धतेचा दावा करत होती. यामध्ये अन्न सुरक्षा आणि मानक (जाहिरात आणि दावे) नियम, २०१८ चे थेट उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे. FSSAI च्या मते, असे '१००%' चे दावे अत्यंत अस्पष्ट असून त्यांची शास्त्रीय पडताळणी करता येत नाही; त्यामुळे सामान्य ग्राहकांची दिशाभूल होण्याची मोठी शक्यता असते. नियामकाने स्पष्ट केले की, यापूर्वीही डाबरला अशा प्रकारे दिशाभूल करणारे दावे तात्काळ थांबवण्याबाबत अधिकृत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या, तरीही नियमांचे पालन न झाल्याने अखेर विक्री थांबवण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.

'ऑरगॅनिक इंडिया' लोगोचा अनधिकृत वापर

FSSAI ने आपल्या सोशल मीडिया (Instagram) पोस्टद्वारे या कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे. डाबरने आपल्या वेबसाईटवर आणि लेबलवर '१००% नैसर्गिक', '१००% शुद्ध', '१००% सेंद्रिय' आणि '१००% कोवळ्या नारळाचे पाणी' असे अनेक दावे केले होते. विशेष म्हणजे, डाबरच्या 'हिमालयन ऑरगॅनिक ॲपल सायडर व्हिनेगर' आणि 'डाबर ऑरगॅनिक मध' या प्रॉडक्ट्सवर 'ऑरगॅनिक इंडिया' (Organic India) चा लोगो वापरण्यात आला होता. FSSAI नुसार, हा अनधिकृत वापर अन्न सुरक्षा आणि मानके (सेंद्रिय अन्न) नियम, २०१७ चे उल्लंघन ठरतो. त्यामुळे या सर्व दिशाभूल करणाऱ्या खाद्य उत्पादनांची विक्री रोखून, डाबरला १५ दिवसांच्या आत केलेल्या कारवाईचा अहवाल (Action Taken Report) सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### "शाल जोडे"




# मराठवाड्यात उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण करा: विभागीय आयुक्तांचे जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री यांच्या 'विकसित महाराष्ट्र' धोरणानुसार मराठवाड्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी औद्योगिक विकासाला गती देणे अत्यंत आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर, विभागातील उद्योगांच्या समस्या तातडीने सोडवून उद्योगांसाठी पोषक वातावरण तयार करावे, असे महत्त्वपूर्ण निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. विभागीय आयुक्त कार्यालयात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी (एमआयडीसी) संबंधित समस्या व उपाययोजनांच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत ते दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते. या बैठकीस मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.




बैठकीमध्ये विभागातील एकूण औद्योगिक भूखंड, त्यांचे वाटप, शिल्लक भूखंड, तसेच बंद पडलेल्या उद्योगांची कारणे आणि विकासातील अडचणींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी आणि उद्योजकांनीआपल्या सूचना व मते मांडली. मराठवाड्याच्या प्रगतीसाठी उद्योगांशी संबंधित अडचणी तात्काळ दूर करणे गरजेचे असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत (आयटीआय) दर्जेदार तांत्रिक व व्यावहारिक कौशल्य प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात आला असून त्यासाठी आयटीआय महाविद्यालयांना आवश्यक सर्व सुविधा पुरवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच औद्योगिक वसाहतींमध्ये रस्ते, पाणी, वीज आणि इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच प्रभावी घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन करण्याचे निर्देशही दिले.

बाहेरील भागातून येणारे उद्योग कोणत्याही अडचणींमुळे बंद पडणार नाहीत किंवा जिल्हा सोडून जाणार नाहीत, यासाठी कठोर व संरक्षणात्मक उपाययोजना राबवण्याचे आदेश त्यांनी दिले. एमआयडीसी क्षेत्रातील भूखंड वाटपानंतर विहित मुदतीत उद्योग सुरू होणे बंधनकारक असून, उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या अनावश्यक परवानग्या कमी करून ही प्रक्रिया अधिक वेगवान व सुलभ करावी आणि परवानगी मिळूनही विहित मुदतीत उद्योग सुरू न करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले. उद्योगांच्या विविध समस्या वेळेवर सोडवून त्यांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी नियमितपणे आढावा बैठका घेऊन सातत्याने पाठपुरावा करावा, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## सं पा द की य

### परिसीमन आणि महिला आरक्षण: संसदीय लोकशाही, संख्याबळ अन् भविष्याची दिशा

संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ ऑगस्ट रोजी संपत असतानाच केंद्र सरकार परिसीमन आणि महिला आरक्षणाशी संबंधित अत्यंत महत्त्वपूर्ण घटनादुरुस्ती विधेयकांबाबत एका मोठ्या राजकीय आणि संसदीय निर्णयाच्या तयारीत आहे. ही दोन्ही विधेयके मंजूर करून घेण्यासाठी ऑगस्टच्या उत्तरार्धात तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्याचा विचार सरकारकडून सुरू आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात दोन-तृतीयांश बहुमताअभावी ही विधेयके बारगळली होती. त्यामुळे आता आवश्यक संख्याबळाची जुळवाजुळव करून आणि विरोधी पक्षांशी संवाद साधून ही ऐतिहासिक विधेयके मार्गी लावण्याचा सत्ताधारी पक्षाचा प्रयत्न आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि इतर प्रमुख नेत्यांची घेतलेली भेट याच दिशेने पडलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले पाहिजे. परिसीमन आणि महिला आरक्षण ही दोन्ही विधेयके भारताच्या राजकीय आणि लोकशाही रचनेचा चेहरामोहरा बदलून टाकण्याची क्षमता ठेवतात. प्रस्तावित विधेयकानुसार आगामी लोकसभा निवडणुकीपासूनच ३३ टक्के महिला आरक्षण लागू करण्याचा सरकारचा मानस आहे, जो देशातील निम्म्या लोकसंख्येला राजकीय प्रक्रियेत मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अत्यंत क्रांतिकारी ठरू शकतो. दुसऱ्या बाजूला, लोकसभेच्या आणि विधानसभांच्या जागांमध्ये ५० टक्के वाढ करण्याची तरतूद परिसीमन विधेयकात समाविष्ट करून प्रादेशिक व विशेषतः दक्षिण भारतीय राज्यांची 'प्रतिनिधित्व कमी होण्याची' भीती दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे दोन्ही मुद्दे अत्यंत संवेदनशील आणि दूरगामी परिणाम करणारे आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून संसदेतील दोन्ही सभागृहांत विविध मुद्द्यांवरून सुरू असलेला अभूतपूर्व गदारोळ, विरोधकांची आक्रमक भूमिका आणि मुख्य मुद्द्यांवर चर्चा न होताच विधेयके मंजूर होण्याचा पायंडा चिंताजनक आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवश्यक असलेले ३५२ चे दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याने विधेयके नामंजूर झाली होती. आता राजकीय समीकरणांमध्ये झालेले बदल आणि संभाव्य सहकार्याच्या जोरावर ही दुरुस्ती मंजूर करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. परंतु, अशा घटनात्मक आणि मूलभूत स्वरूपाच्या सुधारणा केवळ संख्याबळाच्या जोरावर किंवा घाईघाईत न होता, व्यापक चर्चेने आणि सर्वसमावेशक राजकीय सहमतीने पार पडणे अत्यंत गरजेचे आहे. लोकशाहीत विरोधकांचे आक्षेप ऐकून घेणे आणि सत्ताधाऱ्यांनी त्यांना विश्वासात घेणे हीच निरोगी संसदीय परंपरेची खूण असते. विशेष अधिवेशनाचा प्रस्ताव असो किंवा पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा टप्पा असो, सरकारने विरोधकांच्या शंकांचे निरसन करून आणि विरोधकांनीही राजकीय मतभेद बाजूला ठेवून देशाच्या व महिलांच्या हिताच्या या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा करणे आवश्यक आहे. तरच या घटनादुरुस्तीला सर्वसमावेशक स्वीकारार्हता लाभेल आणि भारतीय लोकशाही अधिक मजबूत होईल.

# बेरोजगारी तरुणांच्या असंतोषाचं कारण? सरकारसमोरील सर्वात मोठी आव्हानं

वैद्यकीय प्रवेश परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटीविरोधात भारतात मोठं आंदोलन झालं. यातही 'जेन - झी' (Gen-Z) च्या तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता. अगदी देशभरात रस्त्यावर उतरत आंदोलन केलं गेलं.

या आंदोलनाचा परिणाम म्हणजे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समोर उभ्या ठाकलेल्या एका संकटातून बाहेर पडायला मदत झाली. पण अशाप्रकारे तरुणाईचा वाढलेला जो असंतोष आहे, तो नियंत्रणात ठेवणं मात्र सरकारसमोर आगामी काळातलं मोठं आव्हान ठरू शकतं.

मोदींनी पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर जलदगती न्यायालयात खटला चालवणार असल्याची घोषणा केली. तसंच, परीक्षा प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठं नाव असलेल्या नंदन निलेकणी यांची नियुक्तीही केली.

पण याबरोबरच तरुणाईला भेडसावणाऱ्या चिंता कमी करण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज पडणार आहे. कारण चांगलं जीवन जगण्यासाठीच्या चांगल्या संधी किंवा रोजगार मिळवण्यासाठी उपयोगी शिक्षण देण्यास असमर्थ असलेल्या व्यवस्थेमुळं संयम सुटत असल्याचं तरुण-तरुणी म्हणत आहेत.

"बाजारपेठेत गेल्या 10 वर्षांमध्ये रोजगाराच्या एकूणच परिस्थितीतक प्रचंड स्पर्धा निर्माण झाली असल्याचं चित्र आहे. शेतीव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत नोकऱ्या वाढलेल्या नाहीत. शिवाय वेतनही स्थिर राहिलं आहे," असं मत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि 'इंडिया आऊट ऑफ वर्क- रिथिंकिंग इंडियाज ग्रोथ स्टोरी' या नवीन पुस्तकाचे लेखक संतोष मेहरोत्रा यांनी बीबीसीला सांगितलं.

भारतासमोर एकाच वेळी अनेक समस्या आहेत. अर्थव्यवस्थेची एकूण रचनाच कमकुवत आहे. त्याचा परिणाम म्हणजे कामगारांची मागणी वाढत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

शिवाय, आपली शिक्षण व्यवस्था एवढी कमकुवत आहे की, त्यातून रोजगारासाठी आवश्यक असे सक्षम कामगार किंवा उमेदवार त्यातून तयार होत नाहीयेत.

**बेरोजगारीचे गंभीर संकट**

भारताच्या आर्थिक विकासाच्या मुद्द्यावर आतापर्यंत जेव्हाही टीका झाली, त्यावेळी सरकारनं कायम, पायाभूत सुविधांवर केलेल्या मोठ्या सरकारी खर्चातून झालेली जीडीपी वाढ दाखवत स्वतःचा बचाव केला आहे.

पण गेल्या महिन्यात झालेल्या आंदोलन आणि त्यानंतरच्या घटनांमुळं अखेर शिक्षण क्षेत्रातील संकट आणि युवकांमधील बेरोजगारीच्या आव्हानाचा सरकारला सामना करावा लागला असं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

पण सरकारनं थेट खात्यांत पैसे ट्रान्स्फर करण्यासारख्या ज्या योजना अंमलात आणल्या आहेत, त्या पाहता सरकारला या विषयाची किमान जाणीव असल्याचं स्पष्ट होतं, असंही मेहरोत्रा म्हणाले.

पण तसं असलं तरी या सर्वांवर उपाययोजना करणं हे प्रचंड कठीण काम आहे.

भारतात सध्या जगातील सर्वात जास्त तरुण लोकसंख्या आहे. या 15 ते 29 वयोगटातील तरुण-तरुणींचा आकडा 36 कोटींहून अधिक आहे.

देशात शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्यांचा विचार करता यात मोठी प्रगती झाली असून, गेल्या दोन दशकांत तर खासगी महाविद्यालयं आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांच्या संख्येतही चांगलीच वाढ झाली आहे.

त्याचवेळी शिक्षणातून रोजगार मिळणं आणि विशेषतः पदवीधरांच्या रोजगार निर्मितीच्या दिशेनं होणाऱ्या प्रवासात आणि अजूनही अनेक अडथळे असल्याचं अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या स्टेट ऑफ वर्किंग इंडिया 2026 च्या अहवालात म्हटलं आहे.

इतर वयोगटातील नागरिकांशी तुलना केली तर तरुणांमधील बेरोजगारीचा दर हा जवळपास चार पटीनं अधिक आहे. विशेष म्हणजे जागतिक सरासरीपेक्षाही हे प्रमाण जास्त आहे.

पण ही काही अगदीच नवी समस्या नाही. देशात गेल्या 25 वर्षांपासून पदवीधरांमधील बेरोजगारीचा दर हा साधारणरणे 35 ते 40 टक्क्यांच्या दरम्यान राहिलेला आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये मात्र यात मोठी वाढ झालेली पाहायला मिळते. लोकसंख्येतील शिक्षण घेऊन रोजगारासाठी सज्ज होणाऱ्या तरुणवर्गाचं वाढलेलं प्रमाण हेही त्यामागचं एक कारण आहे.

**'तात्पुरत्या उपाययोजना नको'**

आपण 1983 मधील आकडेवारीचा विचार केला तर त्यावेळी 20 ते 29 वयोगटातील फक्त 4 टक्केच तरुण-तरुणी पदवीधर होते. तर याच वयोगटातले जवळपास 13 टक्के तरुण बेरोजगार होते. पण 2023 मध्ये हा आकडा बदलून पदवीधर तरुण-तरुणींची संख्या 28 टक्के झाली त्याचवेळी बेरोजगारांचं प्रमाण तब्बल 67 टक्के होतं.

रोजगार मिळवण्याच्या शक्यतेचा विचार करता शिक्षणाची गुणवत्ता हा त्यावर गंभीर परिणाम करणारा मुद्दा ठरला आहे. एकीकडे पदवीधर तरुणवर्गाची संख्या वाढली, पण त्यांच्यासाठी त्या प्रमाणात रोजगारनिर्मिती झाली नाही.

या अहवालानुसार, "2004-05 ते 2023 या दरम्यानच्या काळात, दरवर्षी सुमारे 50 लाख तरुण-तरुणी पदवीधर झाले. पण त्यापैकी फक्त 28 लाख पदवीधर तरुणांना रोजगार मिळाला. कायमस्वरुपी पगारी नोकऱ्या मिळणाऱ्यांची संख्या तर त्याहूनबी कमी होती. त्याचा परिणाम म्हणजे, पदवीधर बेरोजगारांचं प्रमाण वाढलं आणि उत्पन्नवाढीचा वेग त्याचवेळी कमी झाला."

अशी परिस्थिती असतानाच, शिक्षण आणि महत्त्वाकांक्षा असूनही हवं ते मिळत नसल्याची स्थितीही निर्माण झाली आहे.

यात फक्त 3.7 टक्के पदवीधर किंवा पदव्युत्तर शिक्षण असलेल्यांना व्हाईट-कॉलर नोकऱ्या मिळाल्या. तर 7 टक्क्यांपेक्षाही कमी तरुणांना कायमस्वरूपी पगाराच्या नोकऱ्या मिळाल्याचं अहवालातून स्पष्ट झालं.

पण या समस्येवर तात्पुरत्या उपाययोजना करणं योग्य ठरणार नाही.

मेहरोत्रा यांच्या मते, "नोटबंदी (जेव्हा देशातील 86 टक्के चलन काढून घेण्यात आलं आणि त्यावर प्रचंड टीकाही झाली) आणि वस्तू व सेवा कर (GST) लागू केल्यानंतर त्याची ज्या प्रकारे अंमल बजावणी झाली त्याचा लघु आणि मध्यम उद्योगांना (SMEs) बसलेला फटका भरून काढत त्यांना पुन्हा उभारी दिल्यास काही प्रमाणात नक्कीच रोजगार निर्मिती होऊ शकते."

पण, त्यासाठी भारताला उत्पादन क्षेत्राला चालना देणाऱ्या नव्या औद्योगिक धोरणाच्या संदर्भात विचार करणं गरजेचं आहे.

"उत्पादन क्षेत्राचा जीडीपीमध्ये असलेला वाटा हा 2015 मध्ये 17 टक्के होता. पण तो घटून आता 14 टक्क्यांवर आला आहे. 2015 नंतर पाच वर्षे सातत्यानं उत्पादन क्षेत्रातल्या रोजगाराचं प्रमाणं घटत गेल्याचं पाहायला मिळालं आणि आता ते थोड्या प्रमाणात वाढत आहे," असंही त्यांनी म्हटलं.

त्याचवेळी 2020 नंतर कृषी क्षेत्रातील रोजगारात मात्र तब्बल 8 कोटी लोकांची वाढ झाली असल्याचंही मेहरोत्रा यांनी सांगितलं. ही 'छुप्या बेरोजगारीची' (Disguised Unemployment) लक्षणं असल्याचं मत त्यांनी मांडलं. याचं कारण म्हणजे, सर्वसाधारणपणे झपाट्यानं औद्योगिकीकरण होणाऱ्या देशांमध्ये कामगार शेतीतून उत्पादन आणि सेवा क्षेत्राकडं वळतात. पण, इथं चित्रं उलटं आहे.

**भावी पिढीसमोरचं संकट?**

या सर्व आव्हानाशिंवाय आणखी एक मोठं आव्हानही निर्माण झालं आहे. ते म्हणजे भारतात रोजगारनिर्मिती करणाऱ्या क्षेत्रांमध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा मोठा वाटा आहे. सुमारे तीन दशकं हे क्षेत्रं भारतातील मध्यमवर्गींना त्यांच्या स्वप्नातील नोकऱ्या पुरवणारं म्हणून ओळखलं जात होतं. पण आता त्यातही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या वापरामुळं एक नवं आव्हान निर्माण झालं आहे.

गोल्डमन सॅक्सच्या एका अहवालानुसार, भारतात कृषीक्षेत्राशिवाय इतर जे रोजगार होते त्यापैकी 8 ते 12 टक्के नोकऱ्यांवर AI मुळं परिणाम होऊ शकतो. त्याचे संकेतही आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत.

भारतातील नोकऱ्या पुरवणाऱ्याल सर्वात प्रमुख एजन्सींपैकी एक असलेल्या टीम लीज डिजिटलच्या सीईओ नीती शर्मा यांच्या मते, गेल्या काही महिन्यांत आयटी क्षेत्रातील नोकरभरती ही एकेरी आकड्यांत वाढली आहे.

या क्षेत्रात अस्थिर कंत्राटी कामामध्ये वाढ होत आहे. वेतन अनेक वर्षांपासून स्थिर असून दोन दशकांपूर्वी भारतीय STEM पदवीधरांना सहज मिळणाऱ्या नोकऱ्या आता मोठ्या संख्येनं घटल्या आहेत.

देशातील सर्वात मोठ्या सॉफ्टवेअर कंपन्यांपैकी एक असलेल्या एचसीएल टेक्नॉलॉजीजच्या चेन्नईमधील एका नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात, शेकडो कर्मचाऱ्यांनी एकसुरात 'आम्हाला पगारवाढ हवी' अशा घोषणा दिल्याचं पाहायला मिळालं. एकेकाळी चांगल्या लाईफस्टाईलची हमी मिळणाऱ्या या क्षेत्रातील नोकरदारांमध्ये असलेला असंतोष यातून समोर आला.

# स्वीय सहायक : लोकशाहीतील अदृश्य पण अत्यंत महत्त्वाचा दुवा

लोकशाही ही केवळ निवडणुकांवर उभी नसते, तर ती सतत चालणाऱ्या संवाद, समन्वय आणि उत्तरदायित्वाच्या प्रक्रियेवर उभी असते. मतदार आपल्या प्रतिनिधीला निवडून देतो, परंतु त्या प्रतिनिधीपर्यंत नागरिकांच्या समस्या, अपेक्षा आणि प्रशासनाच्या विविध स्तरांवरील माहिती पोहोचविण्याचे काम कोण करतो? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे स्वीय सहायक. दुर्दैवाने भारतीय राजकीय व्यवस्थेत स्वीय सहायकाच्या भूमिकेबाबत फारशी चर्चा होत नाही. अनेकदा त्याला केवळ फोन उचलणारा, भेटी ठरविणारा किंवा कार्यालयीन कर्मचारी म्हणून पाहिले जाते. प्रत्यक्षात स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधी आणि जनता यांच्यातील विश्वासाचा, प्रशासनाशी समन्वयाचा आणि कार्यालयीन कार्यक्षमतेचा अत्यंत महत्त्वाचा दुवा असतो.

आज लोकप्रतिनिधींच्या जबाबदाऱ्या पूर्वीपेक्षा अनेक पटींनी वाढल्या आहेत. मतदारसंघातील विकासकामे, शासनाच्या योजना, नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक माध्यमांवरील संवाद, विविध विभागांशी समन्वय, कायदेविषयक तयारी, कार्यक्रमांचे नियोजन, माध्यमांशी संपर्क आणि जनसंपर्क अशा असंख्य जबाबदाऱ्यांमध्ये एकट्या लोकप्रतिनिधीला सर्व बाबींकडे लक्ष देणे शक्य नसते. अशावेळी स्वीय सहायक हा केवळ सहाय्यक राहत नाही, तर तो लोकप्रतिनिधीच्या कार्यपद्धतीचा 'व्यवस्थापक' बनतो. स्वीय सहायकाचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे माहितीचे व्यवस्थापन. एखाद्या नागरिकाची समस्या, शासनाचा नवीन निर्णय, एखाद्या विभागाची कागदपत्रे किंवा विकासकामांचा अहवाल योग्य वेळी आणि योग्य स्वरूपात लोकप्रतिनिधीसमोर ठेवणे ही मोठी जबाबदारी आहे. चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास निर्णयही चुकीचा होऊ शकतो. त्यामुळे माहितीची सत्यता, अचूकता आणि वेळेचे भान हा स्वीय सहायकाचा मूलभूत गुण असला पाहिजे.

दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे प्रशासनाशी समन्वय. शासनाचे प्रत्येक कार्यालय नियम, प्रक्रिया आणि वेळापत्रकानुसार काम करत असते. नागरिकांच्या समस्या सोडविताना संबंधित विभागाशी सातत्याने संपर्क ठेवणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे, प्रकरणांचा पाठपुरावा करणे आणि कामाच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे हे सर्व स्वीय सहायकाच्या कार्यकुशलतेवर अवलंबून असते. अनेकदा नागरिकांना वाटते की लोकप्रतिनिधीने काम केले, परंतु त्या कामामागे सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या स्वीय सहायकाचे श्रम दडलेले असतात. आजच्या डिजिटल युगात संवाद कौशल्य हे स्वीय सहायकासाठी अत्यावश्यक झाले आहे. सामाजिक माध्यमांमुळे प्रत्येक नागरिक थेट लोकप्रतिनिधीशी संवाद साधू इच्छितो. हजारो संदेश, ई-मेल, फोन आणि भेटी यांचे व्यवस्थापन करताना कोणती बाब तातडीची, कोणती महत्त्वाची आणि कोणती नियमित आहे याचे योग्य वर्गीकरण करणे आवश्यक असते. संवादात संयम, नम्रता आणि स्पष्टता नसेल तर लोकप्रतिनिधीची प्रतिमाही बाधित होऊ शकते.

स्वीय सहायकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळेचे व्यवस्थापन. एका दिवसात अनेक कार्यक्रम, बैठका, शासकीय कार्यालयांच्या भेटी, पत्रकार परिषद, जनसंपर्क दौरे आणि वैयक्तिक भेटी यांचे नियोजन अचूक असणे आवश्यक असते. वेळेचा अपव्यय म्हणजे लोकप्रतिनिधीच्या कार्यक्षमतेवर परिणाम. त्यामुळे प्रत्येक मिनिटाचा योग्य उपयोग करून कार्यांचे प्राधान्यक्रम ठरविणे ही कला स्वीय सहायकाने आत्मसात केलेली असावी. लोकशाही व्यवस्थेत गोपनीयता आणि विश्वासार्हता या दोन मूल्यांना विशेष महत्त्व आहे. अनेक संवेदनशील कागदपत्रे, राजकीय रणनीती, प्रशासकीय निर्णय, वैयक्तिक माहिती आणि गोपनीय चर्चा स्वीय सहायकाच्या माध्यमातून हाताळल्या जातात. त्यामुळे प्रामाणिकपणा, नैतिकता आणि गोपनीयतेचे पालन हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. माहितीचा गैरवापर किंवा वैयक्तिक फायद्यासाठी प्रभावाचा वापर केल्यास केवळ लोकप्रतिनिधीच नव्हे, तर लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही डळमळीत होतो.

आज अनेकदा अशी टीका होते की काही स्वीय सहायक स्वतःलाच लोकप्रतिनिधी समजू लागतात. नागरिकांशी उद्धट वर्तन, आर्थिक व्यवहारांमध्ये हस्तक्षेप, शासकीय अधिकाऱ्यांवर अनावश्यक दबाव किंवा अधिकाराचा गैरवापर अशा घटना लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक आहेत. स्वीय सहायक हा लोकप्रतिनिधीचा प्रतिनिधी असू शकतो, परंतु तो लोकप्रतिनिधी नसतो. त्याचे अधिकार आणि जबाबदाऱ्या यामध्ये स्पष्ट मर्यादा असणे आवश्यक आहे. अधिकारापेक्षा कर्तव्याची जाणीव अधिक महत्त्वाची आहे. स्वीय सहायकाला संविधान, शासनरचना आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. शासनाच्या योजना, विभागीय कार्यपद्धती, कायदेशीर बाबी, निधीची प्रक्रिया आणि लोकप्रतिनिधींचे अधिकार यांचे ज्ञान असल्यास नागरिकांना योग्य मार्गदर्शन करता येते. अन्यथा चुकीची माहिती देऊन नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातात.

एक चांगला स्वीय सहायक हा केवळ कार्यालय चालवत नाही, तर जनतेचा विश्वास जपतो. त्याच्या वागणुकीवरूनच अनेक नागरिक लोकप्रतिनिधीची प्रतिमा तयार करतात. कार्यालयात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आदराने वागविणे, समस्या शांतपणे ऐकून घेणे, शक्य तितकी मदत करणे आणि प्रामाणिकपणे वस्तुस्थिती सांगणे हीच खरी लोकसेवा आहे. लोकप्रतिनिधीपर्यंत पोहोचण्यापूर्वी नागरिकाचा पहिला संपर्क स्वीय सहायकाशीच येत असल्याने तो लोकशाहीचा पहिला चेहरा ठरतो. भारतीय राजकारणात स्वीय सहायकाच्या भूमिकेला अद्याप संस्थात्मक मान्यता आणि व्यावसायिक ओळख मिळालेली नाही. अनेकजण अनुभवाच्या आधारे हे काम करतात, परंतु बदलत्या काळात प्रशासन, तंत्रज्ञान, संवाद, दस्तऐवजीकरण, कायदे, जनसंपर्क आणि डिजिटल व्यवस्थापन यामध्ये सातत्याने अद्ययावत राहणे गरजेचे आहे. कारण आजचा स्वीय सहायक हा फक्त कार्यालयीन कर्मचारी नसून माहिती व्यवस्थापक, समन्वयक, जनसंपर्क अधिकारी, वेळ व्यवस्थापक आणि लोकशाही प्रक्रियेचा सक्रिय घटक आहे.

लोकशाही मजबूत करायची असेल तर केवळ सक्षम लोकप्रतिनिधी पुरेसे नाहीत, तर त्यांच्यासोबत सक्षम, प्रामाणिक, संवेदनशील आणि अभ्यासू स्वीय सहायकांचीही गरज आहे. लोकप्रतिनिधीच्या यशामागे अनेकदा अशा व्यक्तींचे निःशब्द योगदान असते. त्यामुळे या भूमिकेकडे केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर लोकसेवेची जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे. शेवटी, स्वीय सहायक ही पदवी नसून विश्वास, समर्पण, कार्यकुशलता आणि उत्तरदायित्व यांची परीक्षा आहे. जो स्वीय सहायक नागरिकांच्या वेदना समजून घेतो, प्रशासनाशी प्रभावी समन्वय साधतो, लोकप्रतिनिधीचा वेळ आणि प्रतिमा जपतो तसेच संविधानिक मूल्यांशी प्रामाणिक राहतो, तोच खऱ्या अर्थाने लोकशाहीचा अदृश्य शिल्पकार ठरतो. लोकप्रतिनिधींच्या यशामागील हा शांत, संयमी आणि कार्यक्षम चेहरा अधिक सक्षम झाला, तर लोकशाहीही तितकीच अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख बनेल.

-प्रविण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी : 9923620919

# भारतातील पायाभूत सुविधांचा विस्तार : 'फॅसिलिटी मॅनेजमेंट' क्षेत्रात विकासाची नवी गाथा

भारताच्या प्रगतीचे वर्णन अनेकदा त्याच्या भौतिक परिवर्तनाच्या प्रचंड व्याप्तीवरून केले जाते. आपण बांधलेल्या महामार्गांची लांबी, नवीन व्यावसायिक केंद्रांचे (कमर्शियल हब्स) क्षेत्रफळ आणि 'स्मार्ट सिटीज'च्या महत्त्वाकांक्षी योजना यांबद्दल आपण चर्चा करतो. परंतु, या सुविधांच्या कार्यपद्धतीचा आणि दैनंदिन कामकाजाचा अनेक वर्षांपासून जवळून अभ्यास करणारी व्यक्ती म्हणून मला असे वाटते की, आपण एका अधिक खोलवर होणाऱ्या संरचनात्मक बदलाकडे दुर्लक्ष करत आहोत. भारताच्या पायाभूत सुविधांविषयक महत्त्वाकांक्षेची खरी कसोटी आपण काय निर्माण करतो यात नसून, आपण त्यांची देखभाल व शाश्वतता कशी राखतो यात आहे. आपण अशा एका युगाकडे वाटचाल करत आहोत जिथे 'फॅसिलिटी मॅनेजमेंट' (सुविधा व्यवस्थापन) हे केवळ पडद्यामागचे किंवा किरकोळ देखभालीचे काम राहिलेले नाही; तर ती आपल्या शहरी अर्थव्यवस्थेची एक अदृश्य 'ऑपरेटिंग सिस्टम' बनत आहे.

दशकानुदशके, सरकारी मालमत्तांचे जसे की रुग्णालये, महानगरपालिकेच्या इमारती आणि वाहतूक केंद्रे व्यवस्थापन हे विखुरलेल्या आणि अंतर्गत (इन-हाऊस) प्रयत्नांवर आधारित होते. आज आपण व्यावसायिक आणि एकात्मिक 'आउटसोर्सिंग'च्या दिशेने एक निर्णायक पाऊल पडताना पाहत आहोत. हा केवळ खर्च कपात करण्याचा विषय नाही; तर आधुनिक पायाभूत सुविधांची गुंतागुंत ही जुन्या प्रशासकीय पद्धतींच्या क्षमतेपलीकडची आहे, याची ही जाणीव आहे.

जेव्हा एखादी नगरपालिका किंवा राज्य सरकार एखाद्या व्यावसायिक 'एफएम' (FM) ऑपरेटरसोबत भागीदारी करण्याचा निर्णय घेते, तेव्हा ते केवळ मनुष्यबळ नव्हे, तर एका विशिष्ट निष्पत्तीची (outcome) खरेदी करत असतात. याद्वारे ते मालमत्तेचे अवमूल्यन, तंत्रज्ञान कालबाह्य होणे आणि कामकाजात येणारा व्यत्यय (downtime) यांसारखी जोखीम तज्ज्ञांकडे सोपवत असतात. ज्या देशात सेवा क्षेत्राचा वाटा एकूण 'ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड' (GVA) मध्ये सुमारे ५४% इतका आहे, तिथे सरकारी रुग्णालय असो वा न्यायालयीन संकुल – आपल्या कार्य-परिसराची कार्यक्षमता ही राष्ट्रीय उत्पादकतेवर थेट आणि वर्धित (multiplier) परिणाम घडवून आणते.

**जीसीसीची भरभराट आणि टियर-२ आघाडी**

भारतीय व्यापाराचे भौगोलिक स्वरूप एफएमचा नकाशाही नव्याने आखत आहे. इंदूर, जयपूर आणि कोईम्बतूरसारख्या टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्सचा (जीसीसी) उदय होणे, हा केवळ रिअल इस्टेटमधील एक ट्रेंड नाही; तर ते सेवा-मानकांचे एक आव्हान आहे. या केंद्रांना पहिल्या दिवसापासूनच देखभालीसाठी जागतिक मानकांची आवश्यकता असते.

येथील 'भारताचा दृष्टिकोन' पाश्चात्य अनुभवापेक्षा वेगळा आहे. विकसित देशांना त्यांच्या सुविधा व्यवस्थापन प्रणाली परिपक्व करण्यासाठी जवळपास तीस वर्षे लागली, तर भारत ही उत्क्रांती केवळ एका दशकात घडवून आणत आहे. आपण अशा वेगाने बांधकाम करत आहोत की ज्यामुळे मनुष्यबळाचे तात्काळ आणि उच्च जोखमीचे व्यावसायिकरण आवश्यक आहे. या वेगवान शहरीकरणामुळे एका औपचारिक, प्रशिक्षित पुरवठा साखळीची प्रचंड मागणी निर्माण झाली आहे, जी ग्रामीण मजूर आणि डिजिटल-फर्स्ट ऑफिस किंवा विशेष आरोग्यसेवा प्रयोगशाळेच्या अत्याधुनिक गरजा यांच्यातील दरी भरून काढू शकेल.

**हाऊसकीपिंगपासून मालमत्ता इष्टतमीकरणापर्यंत**

कदाचित सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे आपण एफएमच्या (सुविधा व्यवस्थापनाच्या) मूल्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात आहे. पारंपरिकरित्या, सुविधा व्यवस्थापनाकडे स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पाहिले जात असे; जे आवश्यक असले तरी गौण मानले जात होते. आज, आपण लाइफसायकल ॲसेट मॅनेजमेंटकडे (जीवनचक्र मालमत्ता व्यवस्थापनाकडे) होणारा बदल पाहत आहोत. भारताचा मध्यमवर्ग वाढत असताना आणि उपभोगाच्या पद्धती मॉल्स, हॉटेल्स व मिश्र-वापर प्रकल्पांमधील प्रीमियम अनुभवांकडे वळत असताना, स्वच्छता आणि सुरक्षिततेची अपेक्षा अनिवार्य झाली आहे. परंतु याचे खरे मूल्य वरवरच्या गोष्टींच्या पलीकडे आहे. हवामान बदलाविषयीच्या जागरूकतेच्या युगात, शाश्वततेसाठी एफएम हे एक प्रमुख साधन आहे. व्यावसायिक ऑपरेटर आता केवळ फरशी साफ करत नाहीत; ते कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी एचव्हीएसी (HVAC) प्रणाली ऑप्टिमाइझ करत आहेत, पाण्याचा अपव्यय व्यवस्थापित करण्यासाठी आयओटी (IoT) सेन्सर्स वापरत आहेत आणि अब्जावधी रुपयांच्या मालमत्तांचे आयुष्य वाढवण्यासाठी प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स (भविष्यसूचक देखभाल) लागू करत आहेत. आपण रिॲक्टिव्ह (प्रतिक्रियात्मक) दुरुस्तीकडून प्रोॲक्टिव्ह (सक्रिय) ऑप्टिमायझेशनकडे (इष्टतमीकरणाकडे) संक्रमण करत आहोत. तंत्रज्ञान आता केवळ एक वेगळेपण दर्शवणारे साधन राहिलेले नाही; तो एक असा आधार आहे, जो आपल्याला हजारो ठिकाणांचे व्यवस्थापन त्याच अचूकतेने करण्यास सक्षम करतो, ज्या अचूकतेने आपण एकेकाळी एका इमारतीचे व्यवस्थापन करत होतो.

शेवटी, आपण या क्षेत्राच्या सामाजिक पैलूची दखल घेतली पाहिजे. 'फॅसिलिटी मॅनेजमेंट' (सुविधा व्यवस्थापन) हे भारतातील असंघटित कामगारांना संघटित अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे एक मोठे माध्यम आहे. लाखो लोकांना सामाजिक सुरक्षा, डिजिटल साक्षरता आणि व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना औपचारिक अर्थव्यवस्थेशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे क्षेत्र करत आहे; अशा प्रकारे, राष्ट्र उभारणीत हे क्षेत्र मोलाची भूमिका बजावत आहे.

आपल्या शहरांची देखभाल करणारे लोक हेच भारताच्या विकासाच्या प्रवासातील आघाडीचे घटक आहेत. जेव्हा आपण या क्षेत्राचे व्यावसायिकीकरण करतो, तेव्हा आपण केवळ इमारतीची कार्यक्षमता किंवा त्यातून मिळणारा परतावाच वाढवत नसतो, तर ती इमारत चालवणाऱ्या लोकांचा सन्मान आणि त्यांची आर्थिक प्रगतीही साधत असतो. हा मानवकेंद्रित दृष्टिकोनच आपल्या विकासाची शाश्वतता निश्चित करेल.

२०३० च्या दिशेने वाटचाल करत असताना, भारताच्या ५ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे यश हे आपल्या पायाभूत सुविधांच्या कार्यक्षमतेवर आणि लवचिकतेवर अवलंबून असेल. आपण 'फॅसिलिटी मॅनेजमेंट'कडे केवळ एक 'सहाय्यक सेवा' म्हणून पाहणे थांबवून, त्याकडे एक 'धोरणात्मक संपत्ती' (strategic asset) म्हणून पाहिले पाहिजे. या दशकात त्या कंपन्याच आघाडीवर राहतील, ज्या भारताच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांची व्याप्ती, जागतिक दर्जाची अचूकता आणि स्थानिक पातळीवर कामगारांना मुख्य प्रवाहात आणण्याची संवेदनशीलता यांचा योग्य मेळ घालू शकतील.

ही एक मूक क्रांती वेगाने घडत आहे. भविष्यातील इमारतींची ओळख केवळ त्यांच्या वास्तुकलेवरूनच नाही, तर त्या ज्या बुद्धिमत्तेने आणि काळजीपूर्वक व्यवस्थापित केल्या जातात, त्यावरून होईल. या नव्या भारतात, व्यावसायिक 'फॅसिलिटी मॅनेजमेंट' हाच तो पाया आहे ज्यावर आपले भविष्य उभे राहत आहे.

- रूपाळ सिन्हा, मुख्य कार्यकारी अधिकारी
(CEO), बीव्हीजी इंडिया लिमिटेड

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## आचार्यश्री 108 हेमसागरजी गुरुदेव यांच्या 47 व्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवाला भक्तिमय प्रारंभ



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : सिद्धांत चक्रवर्ती आचार्यश्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांच्या ४७ व्या चातुर्मास कलशस्थापना महोत्सवाचा शुभारंभ भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. पहाटे भगवान जिनेंद्र यांचा अभिषेक, आचार्य १०८ सन्मतीसागरजी महाराज यांचे पूजन-विधान आणि संगीतमय पूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

यानंतर आचार्यश्री १०८ हेमसागरजी गुरुदेव यांचे मंगल आगमन झाले. नवयुवक मंडळ व बहू मंडळाने त्यांचे उत्साहात स्वागत केले. प्रवचनात आचार्यश्रींनी चातुर्मास हा आत्मशुद्धी, संयम, तप, स्वाध्याय आणि धर्मसाधनेचा सुवर्णकाळ असल्याचे सांगत क्रोध, मान, माया व लोभाचा त्याग करून नवकार मंत्र, सामायिक, प्रतिक्रमण आणि गुरुवचनांचे आचरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन चातुर्मास समितीचे मुख्य संयोजक संजय पापडीवाल यांनी केले. त्यांनी चातुर्मासाचे महत्त्व तसेच दिगंबर जैन साधूंच्या साधना आणि श्रावकांच्या कर्तव्यांविषयी मार्गदर्शन केले. महिला मंडळ, बहू मंडळ तसेच बालकांच्या भक्तिमय नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शैलेश पहाडे व वैशाली पहाडे यांनी भजन व सूत्रसंचालन केले.

यंदाच्या कलशस्थापनेचा प्रथम मान पूनमचंद विजयकुमार जैन अग्रवाल यांना मिळाला. विविध विशेष कलशांचा लाभ अनेक गुरुभक्तांनी घेतला. महाप्रसादाचे आयोजन शैलेन्द्र अभिषेक, राजेश सेठी व प्रणय सेठी परिवारातर्फे करण्यात आले. चातुर्मासाच्या या मंगल प्रारंभाने धर्म, साधना आणि संस्कारांचा संदेश देत पुढील धार्मिक उपक्रम यशस्वी होवोत, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## शिक्षण संस्थाचालक महासंघाची नवी कार्यकारिणी जाहीर; द्वारकादास पाथ्रीकर अध्यक्ष, मधुकरराव भोळे कार्याध्यक्ष

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याच्या उद्देशाने शिक्षण संस्थाचालक महासंघाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. पोस्टर डेव्हलपमेंट कॉलेज, सिडको एन-५ येथे ४ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत ही निवड एकमताने करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ द्वारकादास पाथ्रीकर होते. बैठकीत महासंघाच्या विविध पदांवरील पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यानुसार अध्यक्षपदी द्वारकादास पाथ्रीकर तर कार्याध्यक्षपदी मधुकरराव भोळे यांची निवड झाली.

उपाध्यक्षपदी पूजा विटोरे, डॉ. कुतुबनिस्सा खान, के. व्ही. वाघमारे, नंदकिशोर गावडे आणि डॉ. संजय गायकवाड यांची निवड करण्यात आली. सरचिटणीसपदी महेंद्र खानापुरकर, चिटणीसपदी गदखाने तर कोषाध्यक्षपदी विश्वनाथ तरटे यांची जबाबदारी सोपविण्यात आली. विधी सल्लागार म्हणून ॲड. तेजराव गाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली असून, सल्लागार म्हणून मुकीम देशमुख, माजी आमदार किशोर पाटील आणि माजी आमदार एम. एम. शेख यांची निवड करण्यात आली.

यावेळी उपस्थितांनी शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या, संस्थाचालकांचे प्रश्न आणि आगामी काळातील संघटनात्मक उपक्रमांवर चर्चा केली. नव्याने निवड झालेल्या कार्यकारिणीने शिक्षण संस्थांच्या हितासाठी प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## इंदिस मुलतानी यांच्या प्रयत्नांना यश वकील व संघामार्फत मांडला अभिनंदनचा ठराव

**सिल्लोड प्रतिनिधी** : येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय तसेच सरकारी वकील कार्यालयास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी मंजुरी देण्यात आली.मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी यासाठी आवश्यकन्यायिक अधिकारी कर्मचाऱ्यांची पद निर्मिती आणि आर्थिक तरतुदीस मान्यता दिली आहे या ऐतिहासिक निर्णयानंतर सिल्लोड वकील संघाच्या वतीने न्यायालय परिसरात फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष साजरा करण्यात आला.

सिल्लोड येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय व्हावे,ही वकील संघाची अनेक वर्षापासूनची मागणी होती यासाठी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी यांनी मुख्यमंत्र्याकडे सातत्याने पाठपुरवठा केला होता.सध्या येथे तीन कनिष्ठ व एक वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय कार्य करत आहे.नवीन सत्र न्यायालयामुळे सिल्लोड आणि सोयगाव तालुक्यातील नागरिकांची छत्रपती संभाजीनगर जिल्हा मुख्यालयाला मारल्या जाणाऱ्या फेऱ्या मधून सुटका होणार असून न्यायप्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे. निर्णयाचे वृत्त समजतात सिल्लोड वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट अशोक तायडे व पदाधिकाऱ्यांनी आनंद उत्सव साजरा करीतत मुलतानी यांच्या अभिनंदन ठराव संमत केला.यावेळी वकील संघाचे पदाधिकारी अशोक तायडे हमीद खान विजय मांडल्याच्या अनिस अहमदउपस्थित होते

## इद्रिस मुलतानी यांनी घेतली ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट ग्रामीण विकासावर चर्चा



**फर्दापूर प्रतिनिधी** : फर्दापूर भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी आज मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. जयकुमारजी गोरे यांची सदिच्छा भेट घेतली या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासासंदर्भात आणि जनतेच्या हिताच्या विविध प्रश्नांवर अत्यंत सकारात्मक चर्चा पार पडली

या भेटीतील चर्चेचे प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे

राज्यातील ग्रामीण विकास ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला गती देणे आणि योजना प्रभावीपणे राबवणे

ग्रामपंचायतींचे बळकटीकरण तळागाळातील लोकशाहीचा कणा असलेल्या ग्रामपंचायतींना अधिक सक्षम व बळकट करण्याबाबत सविस्तर विचारविनिमय

विकासकामे व जनहित प्रलंबित असलेली विविध विकासकामे मार्गी लावणे तसेच जनहिताच्या इतर महत्त्वाच्या विषयांवर चर्चा

या सदिच्छा भेटीत ग्रामविकास मंत्री मा. गोरे साहेब यांनी दिलेल्या मोलाच्या मार्गदर्शनाबद्दल इद्रिस मुलतानी यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत

## मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर अधिकाऱ्यांकडून गोद्री पळसखेडा टिटवी सावळदबारा' रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी




**फर्दापूर प्रतिनिधी** : फर्दापूर स्थानिक विशेष तब्बल २५ वर्षांची प्रतीक्षा संपवून गोद्री पळसखेडा टिटवी सावळदबारा' रस्त्याचे काम सुरू करण्याचे आदेश राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले आहेत या आदेशानंतर आता प्रशासकीय पातळीवरही अत्यंत वेगवान हालचाली सुरू झाल्या असून आदेश निघताच आज संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष रस्त्यावर जाऊन पाहणी केली आहे

पाहणी दौऱ्यातील प्रमुख उपस्थिती

गेल्या अनेक वर्षांपासून वनविभागाच्या मंजुरीअभावी रखडलेल्या या रस्त्याच्या प्रत्यक्ष पाहणीसाठी आज लोकप्रतिनिधी वनविभाग आणि बांधकाम विभागाचे अधिकारी एकाच वेळी जागेवर हजर होते यावेळी पाहणी दौऱ्यात खालील मान्यवर उपस्थित होते

पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण पंचायत समिती सदस्य राहुल राठोड

फॉरेस्ट ऑफिसर सुरज आवरे

सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर नितीन राठोड तसेच वनविभागाचे इतर सर्व वनपाल उपस्थित होते

कामाचा मार्ग अखेर मोकळा

हा प्रस्तावित रस्ता वनक्षेत्रातून जात असल्याने त्याला वनविभागाची मंजुरी अत्यंत गरजेची होती आज स्वत फॉरेस्ट ऑफिसर RFO आणि PWD चे इंजिनिअर यांनी संयुक्तपणे जागेवर जाऊन पाहणी केल्यामुळे या रस्त्याच्या पुढील तांत्रिक प्रक्रिया आणि अंदाजपत्रकाचे काम आता वेगाने मार्गी लागणार आहे

अनेक वर्षांपासूनचा वनवास संपून रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष गती मिळत असल्याचे पाहून परिसरातील ग्रामस्थांमधून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे

## शहरामध्ये मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला जोरदार प्रतिसाद; 96.28 टक्के गणना अर्जांचे वितरण पूर्ण

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR 2026) मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उत्स्फूर्त मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत जिल्ह्यातील ३२ लाख १६ हजार १६७ मतदारांपैकी ३० लाख ९६ हजार ६३१ (९६.२८ टक्के) मतदारांना गणना (Enumeration) अर्जांचे वितरण यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. याशिवाय, प्राप्त झालेल्या अर्जांपैकी २५ लाख ३ हजार ४३२ (७७.८४ टक्के) अर्जांचे डिजिटायझेशनही पूर्ण करण्यात आले आहे. नागरिकांना अर्ज भरण्यासाठी पुरेशी संधी मिळावी म्हणून जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी महत्त्वाची घोषणा केली आहे. या मोहिमेत गणना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ८ ऑगस्ट २०२६ ऐवजी १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. ज्या नागरिकांनी अद्याप आपला अर्ज भरलेला नाही, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्याकडे गृहभेटीदरम्यान किंवा थेट आपले अर्ज लवकरात लवकर जमा करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघांमध्ये युद्धपातळीवर काम सुरू असून, प्रत्येक मतदारसंघाची स्थिती खालीलप्रमाणे आहे:**

| विधानसभा मतदारसंघ | अर्ज वितरण टक्केवारी | डिजिटायझेशन टक्केवारी |
|---|---|---|
| वैजापूर | १००% | ९०.७९% |
| कन्नड | ९९.८९% | ९०.७७% |
| गंगापूर | ९९.८५% | ८२.५५% |
| सिल्लोड | ९९.८३% | ८५.७१% |
| पैठण | ९९.४०% | ८५.५०% |
| फुलंब्री | ९६.६५% | ७७.३३% |
| औरंगाबाद (मध्य) | ९३.२४% | ६२.४३% |
| औरंगाबाद (पश्चिम) | ९०.३३% | ६७.३५% |
| औरंगाबाद (पूर्व) | ८८.९०% | ६२.६३% |

जिल्ह्यातील ३,२६४ बूथ लेव्हल अधिकारी (BLO) घरभेटी देऊन गणना अर्जांचे वितरण, पडताळणी आणि संकलनाचे काम अत्यंत वेगाने करत आहेत. प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूक आणि अद्ययावत राहावे, यासाठी १७ ऑगस्ट २०२६ या वाढीव मुदतीपूर्वी आपल्या भागातील BLO शी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांनी जिल्ह्यातील समस्त नागरिकांना केले आहे.

## महाडीबीटी 2.0 वर शिष्यवृत्ती अर्जांना सुरुवात; महाआयडी अनिवार्य, विद्यार्थ्यांनी मुदतीत अर्ज करण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

इतर मागास बहुजन कल्याण विभागाने शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी विविध शिष्यवृत्ती योजनांच्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेला महाडीबीटी 2.0 या नव्या पोर्टलवर प्रारंभ केला आहे. विजाभज (VJNT), विमाप्र (SBC), इतर मागास प्रवर्ग (OBC) तसेच पात्र विद्यार्थ्यांनी नव्याने महाआयडी तयार करूनच अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्य शासनाने शिष्यवृत्ती प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुलभ आणि जलद करण्यासाठी महाडीबीटी 2.0 प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे मंजूर होणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा होणार असल्याने अर्ज करताना आधार क्रमांक, बँक खाते, मोबाईल क्रमांक, ई-मेल आणि इतर वैयक्तिक माहिती अचूक भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या पोर्टलवर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, फ्रीशीप, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती तसेच पीएम-यशस्वी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीसह विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारले जात आहेत. व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थी आणि मुलींसाठीच्या विशेष योजनांचाही यात समावेश आहे.

यापूर्वीच्या महाडीबीटी पोर्टलवरील युजर आयडी आणि पासवर्ड या नव्या प्रणालीत ग्राह्य धरण्यात येणार नसून, प्रत्येक विद्यार्थ्याला नव्याने महाआयडी तयार करावी लागणार आहे. नूतनीकरणासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी लॉगिननंतर "माझा अर्ज नूतनीकरण करावा" हा पर्याय निवडण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अर्ज करताना जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रिका तसेच संबंधित योजनेनुसार आवश्यक कागदपत्रे स्पष्ट पीडीएफ स्वरूपात अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रत भविष्यातील संदर्भासाठी जतन करून ठेवण्याचेही आवाहन विभागाने केले आहे.

महाडीबीटी 2.0 अंतर्गत महाविद्यालयांसाठीही नवी कार्यपद्धती लागू करण्यात आली आहे. आता केवळ प्राचार्य लॉगिन उपलब्ध राहणार असून लिपीक लॉगिनची सुविधा बंद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत पडताळून पुढे पाठविण्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांवर सोपविण्यात आली आहे.

मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी शाळांच्या मुख्याध्यापकांनी गट शिक्षण अधिकाऱ्यांशी समन्वय साधून विद्यार्थी व पालकांना अर्ज प्रक्रियेत सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. तसेच इमाव, विजाभज आणि विमाप्र प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशावेळी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क आकारू नये, अशा स्पष्ट सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत.

## जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे नशा मुक्त भारत महाअभियान चा शुभारंभ संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.४ ऑगस्ट

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाच्या नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो (NCB) यांच्या सहकार्याने देशभर नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून 3 ते 20 ऑगस्ट 2026 पर्यंत जनजागृती करण्यात येत आहे.या अभियानाचे स्वागत करून दहा कोटी नशा मुक्त भारत महाअभियानाला प्रतिसाद देत सोयगाव येथील समाज प्रबोधनकार तथा महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार 2016 - 2017 सन्मानित विष्णू विनायकराव मापारी सोयगावकर यांनी दि. 3 ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




प्रथमतः सरस्वती मातेचे पूजन केंद्रप्रमुख फिरोज तडवी,अध्यक्ष रवींद्र काळे,मुख्याध्यापक किरण पाटील यांचे हस्ते करण्यात येऊन या महा अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून कृषी भूषण अरुण सोहनी, आरोग्य दूत दिगंबर वाघ,राजेंद्र पाटील,अध्यक्ष रविंद्र काळे, शालेय समिती अध्यक्ष व सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी समाज प्रबोधनकार विष्णू मापारी सोयगावकर अभियानाचा उद्देश सांगताना म्हणाले की भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाच्या नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो एनसीबी यांच्या सहकार्याने देशभर नशा मुक्त भारत अभियान राबविण्यात येत असून समाजात व्यसनमुक्ती बाबत व्यापक जनजागृती निर्माण करणे,युवकांना सकारात्मक व मूल्याधिष्ठित जीवनशैलीकडे प्रेरित करणे,आणि नशा मुक्त भारत सशक्त भारत हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.तसेच त्यांनी व्यसनाचे दुष्परिणाम सांगुन नशामुक्तीचे महत्व सांगितले.यावेळी रविंद्र काळे,केंद्रप्रमुख फिरोज तडवी,मुख्याध्यापक किरण कुमार पाटील यांनी नशा मुक्ती बद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगला बोरसे यांनी केले.यावेळी सामूहिक नशा मुक्त भारत प्रतिज्ञा घेण्यात आली.कार्यक्रमास विद्यार्थी,गावकरी,सर्व शिक्षक,शिक्षिका, मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला.

## गौरक्षक सेना महाराष्ट्र राज्य प्रदेश मराठवाडा जिल्हा कार्यकारिणी जाहीर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी** :-सनातन रक्षक सेना फाउंडेशन गौरक्षक सेना महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य व मराठवाडा विभागाची कार्यकारणी जाहीर यामध्ये गौरक्षक सेना महिला प्रकोष्ठ महाराष्ट्र प्रदेश प्रचार मंत्री पदी श्रीमती सविताताई पाटील यांच्यासह मराठवाडा वरिष्ठ उपाध्यक्षपदी 1008 महामंडलिकेश्वर सचितानंद सरस्वती स्वामी उर्फ अशोक महाराज पवार तसेच मराठवाडा प्रचारक पदी योगगुरू चंपालाल देवतवाल ठाकूर आणि परभणी जिल्हाध्यक्षपदी गोपालक अविनाश गुरु जोशी पालमकर, उपाध्यक्षपदी गोपालक कृष्णा घुले जिल्हा कार्यकारणी सदस्य निवृत्ती कदम दीपक जाधव पालम तालुका अध्यक्ष प्रमोद इनामदार सुपेकर पालम तालुका उपाध्यक्ष किशन पत्की तसेच गौरक्षक सेना महिला प्रकोष्ठ जिल्हाध्यक्षपदी सौ. पोर्णिमा ताई लोकरे वरील मराठवाडा व जिल्हा कार्यकारणी निवड करण्यात आली हे निवड गौरक्षक सेना सनातन रक्षक सेना फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष अनुरमाताई सिंह यांच्या आदेशाने तसेच गौरक्षक सेना राष्ट्रीय अध्यक्ष सुनीलभाई सेजाणी त्यांच्या पुढाकारातून गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांच्या शिफारशीनुसार वरील सर्व नियुक्ती निवड करण्यात आली बद्दल पुढील कार्यास हार्दिक स्वागत हार्दिक अभिनंदन हार्दिक शुभेच्छा गौरक्षक गोसेवक गोपालक अशी माहिती गौरक्षक सेना महाराष्ट्र प्रदेश संघटन मंत्री गोसेवक नितीन जाधव गोगलगावकर यांनी पत्रकाद्वारे माहिती दिली.

## करंजगावात गरोदर मातांना पोषण आहार किटचे वाटप; माता-बालकांच्या आरोग्यासाठी पुढाकार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**करंजगाव** : संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी आणि एच. जी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करंजगाव येथे गरोदर मातांसाठी पोषण आहार किट वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. गरोदर महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे, माता व बालकांना आवश्यक पोषण मिळावे तसेच कुपोषणमुक्त समाजाच्या दिशेने प्रभावी पाऊल उचलावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात गरोदर महिलांना संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व, नियमित आरोग्य तपासणी, वेळेवर लसीकरण, हिमोग्लोबिनची पातळी योग्य राखणे तसेच गर्भावस्थेदरम्यान घ्यावयाची आवश्यक काळजी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. माता व बालकांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी योग्य पोषण हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे यावेळी तज्ज्ञांनी अधोरेखित केले.

यानंतर गरोदर मातांना डाळी, धान्य, पौष्टिक खाद्यपदार्थ आदींचा समावेश असलेल्या पोषण आहार किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाबद्दल लाभार्थी महिलांनी समाधान व्यक्त करत संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटी व एच. जी. फाउंडेशनचे आभार मानले.

कार्यक्रमाला संवेदना डेव्हलोपमेंट सोसायटीचे मॅनेजर हरीश लालकोट, प्रोग्राम कोऑर्डिनेटर सचिन लिमकर, इर्शाद सय्यद, कृष्णा सरोवर तसेच एच. जी. इन्फ्राचे शुभम सर यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, ग्रामस्थ आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी लेखा विषयक प्रशिक्षणाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.५** :(जिमाका)- महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत गट 'क' संवर्गातील लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र गट 'क' संवर्ग/लेखा लिपीक पर्यवेक्षीय प्रशिक्षण दिनांक १० ऑगस्ट ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये लेखा, वित्तीय कामकाज तसेच शासनाच्या विविध संगणक प्रणालींशी संबंधित विषयांचा समावेश करण्यात आला असून त्यासाठीचा तपशीलवार अभ्यासक्रम छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, बीड आणि धाराशिव येथील जिल्हा कोषागार कार्यालयांमध्ये माहितीसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या प्रशिक्षणासाठी इच्छुक शासकीय कर्मचाऱ्यांना प्रवेश दिला जाणार असून, प्रशिक्षणासाठी आवेदनपत्रासोबत संबंधित कार्यालय प्रमुखांचे शिफारसपत्र विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सर्व शासकीय कार्यालयांतील गट 'क' संवर्गातील इच्छुक तसेच नवनियुक्त कर्मचाऱ्यांना या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार असून, विशिष्ट मॉड्यूलसाठी स्वतंत्र प्रवेशाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, नांदेड, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयातील गट 'क' तसेच लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांना या प्रशिक्षणासाठी नामनिर्देशित करावे, असे आवाहन विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## प्रीमियम टीव्ही पोर्टफोलिओचा केला विस्तार

**नवी दिल्ली** : एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडने आज आपल्या 2026 एआय टीव्ही लाईनअपची घोषणा केली आहे, ज्यामध्ये अल्ट्रा-लार्ज स्क्रीन आणि मिनी एलईडी तंत्रज्ञानाला त्यांच्या प्रीमियम टेलिव्हिजन रणनीतीच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. यामध्ये 292 सेमी (115-इंच) चे फ्लॅगशिप मॉडेल समाविष्ट आहे, जी एलजीने भारतीय बाजारपेठेत आतापर्यंत सादर केलेली सर्वात मोठी मिनी एलईडी स्क्रीन आहे.एलजीच्या 2026 टीव्ही रेंजमध्ये चार डिस्प्ले तंत्रज्ञानांतर्गत - क्यूएनईडी इव्हो मिनी एलईडी, ओएलईडी इव्हो, मायक्रो आरजीबी इव्हो / मिनी आरजीबी इव्हो आणि नॅनो 4K यूएचडी अंतर्गत 25 अल्ट्रा-लार्ज (190 सेमी (75-इंच) आणि त्याहून अधिक) मॉडेल्सचा समावेश आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# दररोज 100 किलोहून अधिक कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांना जागेवरच प्रक्रिया बंधनकारक; नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी, शाश्वत आणि पर्यावरणपूरक करण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ (Solid Waste Management Rules 2026) अंतर्गत शहरातील बल्क वेस्ट जनरेटर (Bulk Waste Generator - BWG) तसेच इव्हेंट वेस्ट मॅनेजमेंट यासाठी स्वतंत्र आणि कडक नियमावली लागू करण्यात येणार आहे.

या नियमांनुसार, ज्या आस्थापनांकडून दररोज १०० किलो किंवा त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण होतो, अशा सर्व संस्था, उद्योग आणि व्यावसायिक आस्थापनांना स्वतःच्या परिसरातच कचऱ्याची प्रक्रिया करणे बंधनकारक राहणार आहे. ओला, सुका आणि इतर प्रकारच्या कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करून त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करावी लागणार आहे. यासाठी कंपोस्टिंग युनिट, बायोगॅस प्रकल्प किंवा अन्य मान्यताप्राप्त प्रक्रिया यंत्रणा उभारणे आवश्यक राहील.


याशिवाय, सर्व बल्क वेस्ट जनरेटरना केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (CPCB) EBWGR पोर्टलवर नोंदणी करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे कचऱ्याचे उत्पादन, वर्गीकरण आणि प्रक्रिया यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. महानगरपालिकेच्या प्राथमिक अंदाजानुसार शहरातील २०० हून अधिक हॉटेल्स, विवाह व मंगल कार्यालये, फंक्शन हॉल्स, मॉल्स, व्यापारी संकुले, शैक्षणिक संस्था आणि विविध उद्योग या नियमांच्या कक्षेत येणार आहेत. नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**इव्हेंट वेस्ट मॅनेजमेंटसाठीही कडक नियम :** शहरात होणाऱ्या सार्वजनिक किंवा खासगी कार्यक्रमांसाठीही स्वतंत्र कचरा व्यवस्थापन नियम लागू करण्यात येणार आहेत. कोणताही कार्यक्रम आयोजित करण्यापूर्वी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. कार्यक्रमातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या प्रमाणानुसार शुल्क आकारले जाईल. कार्यक्रमानंतर परिसरात कचरा आढळल्यास संबंधित आयोजकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

याबाबत महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले की, "छत्रपती संभाजीनगर शहर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविण्याचा आमचा संकल्प आहे. घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ अंतर्गत घेतलेले हे निर्णय शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांनी स्वतःच कचऱ्याची प्रक्रिया करणे ही काळाची गरज आहे. तसेच प्रत्येक कार्यक्रमात कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी आयोजकांनी प्राधान्याने पार पाडली पाहिजे. नियमांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही. स्वच्छ आणि हरित छत्रपती संभाजीनगर घडविण्यासाठी सर्व नागरिक, व्यापारी आणि आस्थापनांनी प्रशासनाला सहकार्य करावे."

महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे शहरातील कचऱ्याचे प्रमाण कमी होण्यास, प्रक्रिया केंद्रांवरील ताण घटण्यास तसेच स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पाच गाईसह एक वासराची परभणी चोरी, कोतवाली पोलिसात गुन्हा दाखल



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:-** प्रशासनानेकितीही कडक बंदोबस्त लावला बंदोबस्त लावला कितीही कडक नियम केले. तरीही प्रशासनाला आव्हान देत व केलेले नियम छपरावर बसवून गोधनाची मोठ्या प्रमाणात चोरी करून घेऊन जाण्याचा सपाटा चोरांनी लावला आहे शहरातील दर्गा रोड परिसरातुन पाच गाई व एक वासरू त्यांची अंदाजीत किंमत 80 हजार इतके असून अनोळखी चोरट्याकडून याप्रकरणी तीन ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


मागील काही दिवसापासून गोवंशची चोरी होण्याचा सपाटाच चोरांनी लावला आहे लक्ष्मीनारातून एका चार चाकी वाहनातून गोवंशाची चोरी करण्यात आली होती या प्रकरणी पोलिसांनी काही आरोपींना ताब्यात घेतले होते व व अशीच गोवंशाची चोरीची घटना कोतवाली पोलीस ठाणे हद्दीत दर्गा रोड परिसरात घडली खालील अब्दुल जब्बार कुरेशी यांनी तक्रार दिली आहे पाच गायी व एक वासरू 20 जुलै रोजी रात्री आठ ते दहा या दरम्यान चोरीला गेले असल्याचे फिर्यादीने परभणी शहरपरिसरातील गावे तसेच तालुक्याचे ठिकाण शोध घेतला मात्र पशुधन अखेर या प्रकरणात तीन ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा ची नोंद करण्यात आली.

## माहिती न देणाऱ्या वर आता थेट FIR ! माहिती लपवणाऱ्या मावसाळा ग्रामपंचायतल छत्रपती संभाजी नगर राज्य माहिती आयोगाचा दणका

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** माहिती मागणाऱ्या नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराची गळचेपी करणाऱ्या मावसाळा ग्रामपंचायत, ता. खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर प्रशासनाला राज्य माहिती आयोगाने चांगलाच झटका दिला आहे. माहिती दडवण्याचा प्रयत्न उघड झाला असून आता जबाबदारांवर थेट FIR दाखल होणार आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते श्री. विरेंद्र वाघ यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलात आयोगाने ऐतिहासिक आदेश दिले.



**मागितल्यापासून आजपर्यंत मला प्रचंड मानसिक क त्रास आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागले ा अधिकार कायदा असूनही नागरिकांना माहिती ांना वेठीस धरले जात आहे. हा आदेश स्वागतार्ह आयोगाने दिलेल्या मुदतीत माहिती मिळाली नाही अन्यायाविरुद्ध थेट उच्च न्यायालयात दाद मागणार आहे. पारदर्शकता आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी आमची लढाई सुरूच राहील."**

**- विरेंद्र वाघ**

प्रकरण काय आहे?

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागितलेल्या माहितीला ग्रामपंचायतकडून "अभिलेखात उपलब्ध नाही" असे बेजबाबदार उत्तर देण्यात आले. प्रथम अपीलानंतरही जाणूनबुजून टाळाटाळ सुरूच राहिली. अखेर प्रकरण राज्य माहिती आयोगात पोहोचताच प्रशासनाची पोलखोल झाली.

**आयोगाचा कडक आदेश :**

**१. ३० दिवसांची अंतिम मुदत:** गट विकास अधिकारी, पंचायत समिती खुलताबाद यांनी ३० दिवसात माहिती शोधून विनामूल्य द्यावीच लागेल.

**२. थेट FIR चे आदेश:** माहिती मिळाली नाही तर अभिलेख गहाळ करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ नुसार थेट पोलीस ठाण्यात FIR दाखल करावी.

**३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जबाबदार:** आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास जबाबदारी थेट जि.प. छत्रपती संभाजीनगर यांच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर राहील.

**महत्वाचा संदेश:**

हा आदेश स्पष्ट करतो की, "माहिती नाही" म्हणत वेळ मारून नेण्याचे दिवस संपले. सरकारी नोंदी गहाळ करणे आता गुन्हा आहे. पारदर्शकता नाकारणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यावर कारवाई होणार असल्याचेही विरेंद्र वाघ, माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी म्हटले आहे.

## पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाची तिसरी नियोजन बैठक रविवारी

**छ.संभाजीनगर :** परिवर्तनवादी साहित्य चळवळीला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात येत असलेल्या पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या तिसऱ्या नियोजन बैठकीचे आयोजन रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता सुभेदारी विश्रामगृह, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. या बैठकीत संमेलनाच्या आयोजनासंदर्भातील विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा होणार असून संमेलनाची रूपरेषा, विविध समित्यांची जबाबदारी, निमंत्रित साहित्यिकांची अंतिम यादी, स्मरणिका प्रकाशन, आर्थिक नियोजन, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच संमेलन अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याबाबत महत्त्वाचे निर्णय घेतले जाणार आहेत. परिवर्तनवादी विचारांना साहित्याच्या माध्यमातून अधिक बळ देण्यासाठी आणि राज्यभरातील लेखक, कवी, विचारवंत, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यप्रेमींना एकत्र आणण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

या ऐतिहासिक संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व सदस्य, पदाधिकारी, समिती सदस्य आणि सहकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहून आपल्या सूचना व सहभागातून संमेलन अधिक भव्य, दर्जेदार आणि यशस्वी करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## विशेष सर्वसाधारण सभेत चार स्वीकृत सदस्यांची निवड




हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

**परभणी:-** अनेक दिवसातून अडकून पडलेल्या स्वीकृत सदस्याच्या निवडीचा हा प्रश्न निकाली निघणार असून महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज रोजी बी रघुनाथ सभागृहात अकरा वाजता महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यामध्ये चार सूत्र सदस्यांची निवड करण्यात आली यामध्ये विनोद कदम अंबिका डहाळे राहुल मुरकुटे आणि शेख फहाद शेख हमीद यांचा समावेश आहे.

परभणी शहरात महापालिकेत एकूण 65 सदस्य आहेत तर सहा सूत्र सदस्य आहेत भाजप राष्ट्रवादी काँग्रेस शिवसेना उभारताचं काँग्रेस कडून सुत्र सदस्य पदासाठी अनेक जण इच्छुक होते अनेक आणि आपल्या परीने फिल्डिंग सुद्धा लावली होती अखेर ही प्रतीक्षा पाच ऑगस्ट रोजी संपली 5 ऑगस्ट रोजी प्रक्रिया पार पडली. शिवसेना उबाटा गटा कडून अंबिकाडहाळे राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट कडून शेख फहाद शेख हमीद काँग्रेसकडून विनोद कदम शहर विकास आघाडी कडून राहुल मुरकुटे यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे महापौर सय्यद इकबालउपमाहापौर गणेश देशमुख आयुक्त नितीन नार्वेकर नगरसचिव विकास रत्नपारखी यांची उपस्थिती होती या निवडणूक प्रक्रियेनंतर महापौर सय्यद इकबाल यांच्या हस्ते निवड झालेल्या त्यांचा सत्कार करण्यात आला या विशेष बैठकीत सर्व मनपा सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

## जवाहरनगर पोलिसांचा 600 जनजागृती बॅनर्सद्वारे नागरिकांना सतर्कतेचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांमध्ये सुरक्षा व सतर्कतेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने जवाहरनगर पोलीस ठाण्याने अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे ६०० जनजागृतीपर बॅनर्स लावून नागरिकांना विविध प्रकारच्या गुन्ह्यांपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.






पोलीस आयुक्त पवार, पोलीस उपायुक्त नवले, पोलीस सहाय्यक आयुक्त कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जवाहरनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन कुंभार यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला आहे. शहरात वाढत असलेल्या महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र व सोनसाखळी हिसकावण्याच्या घटना, मोबाईल स्नॅचिंग, ऑनलाइन फसवणूक आणि इतर गुन्ह्यांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हे बॅनर्स उभारण्यात आले आहेत.

बॅनर्सवर महिलांनी मौल्यवान दागिने उघडपणे परिधान करणे टाळावे, रस्त्यावर चालताना मोबाईलचा वापर करू नये, संशयास्पद दुचाकीस्वारांवर लक्ष ठेवावे, एकांत व अंधाऱ्या रस्त्यांवरून प्रवास टाळावा तसेच मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात, अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या आहेत.

याशिवाय डायल ११२ या आपत्कालीन मदत सेवेची माहिती, सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय आणि कोणतीही संशयास्पद घटना अथवा व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याचे आवाहनही या माध्यमातून करण्यात आले आहे.

जवाहरनगर पोलीस ठाण्याच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेल्या या जनजागृती मोहिमेमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता वाढण्यास मदत होणार असून, नागरिकांनी सतर्क राहून पोलिसांना सहकार्य केल्यास गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## गुणवत्ता, संस्कार आणि मूल्यांची जपणूक महत्त्वाची – अंजली सिन्हा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जेएनईसीचे माजी प्राचार्य स्व. प्रतापराव बोराडे यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'प्राचार्य प्रतापराव बोराडे स्मृती सन्मान' यंदा संस्थेच्या माजी विद्यार्थिनी तथा उद्योगक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अंजली सिन्हा यांना प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना बदलत्या काळातील कौशल्ये आत्मसात करण्याचा संदेश दिला.



अंजली सिन्हा म्हणाल्या की, प्राचार्य बोराडे यांनी केवळ कुशल अभियंते घडवले नाहीत, तर मूल्याधिष्ठित, जबाबदार आणि सक्षम व्यक्तिमत्त्वे घडविण्याचे कार्य केले. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञानासोबतच वित्तीय साक्षरतेचे महत्त्व ओळखावे. कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी मूलभूत संकल्पनांवर भक्कम प्रभुत्व मिळवणे, आयुष्यभर विद्यार्थी राहून सातत्याने नवीन गोष्टी शिकत राहणे आणि बदल स्वीकारण्याची तयारी ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकांशी प्रभावी संवाद साधण्याची, विविध पार्श्वभूमीच्या व्यक्तींशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. जेएनईसीमध्ये मिळणारे शिक्षण गुणवत्ता, संस्कार आणि सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने देशातील कोणत्याही नामांकित संस्थेपेक्षा कमी नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सन्मान स्वीकारताना अंजली सिन्हा म्हणाल्या की, प्राचार्य प्रतापराव बोराडे यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आहे. आजवर अनेक पुरस्कार मिळाले असले, तरी माणसं घडवणाऱ्या गुरूंच्या स्मरणार्थ मिळालेला हा सन्मान सर्वाधिक मोलाचा असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम, स्मार्ट वर्क, प्रभावी नेटवर्किंग आणि स्वतःची सकारात्मक ओळख निर्माण करणारे ब्रँडिंग या चार गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. जेएनईसीमध्ये विद्यार्थ्यांमध्ये समानतेची भावना रुजविण्याचे कार्य प्राचार्य बोराडे यांनी केले. संस्थेतील गणवेशामुळे श्रीमंत-गरीब किंवा कोणत्या राज्यातून विद्यार्थी आला आहे, हा भेद नष्ट होऊन प्रत्येक विद्यार्थी संस्थेची ओळख बनतो, अशी शिकवण त्यांनी दिली. आपल्या आजवरच्या यशामागे जेएनईसी आणि प्राचार्य बोराडे यांचे संस्कार व मार्गदर्शन यांचा मोठा वाटा असल्याचे सांगत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

## अग्निवीर टेक्निकल व अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) भरती रॅलीसाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करावेत

**छत्रपती संभाजीनगर, दि.५ :** (जिमाका)-१ ईएमई सेंटर, सिकंदराबाद येथे युनिट हेडक्वार्टर कोटा अंतर्गत वर्ष २०२७ साठी अग्निवीर टेक्निकल तसेच अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) पदांच्या भरतीसाठी रिक्रूटमेंट रॅली आयोजित करण्यात आली आहे. या भरतीसाठी पात्र उमेदवारांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या भरती प्रक्रियेसाठी माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा, युद्ध विधवा तसेच सेवारत सैनिक यांच्या पाल्यांना तसेच स्वतःच्या भावास पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. अग्निवीर ट्रेड्समन (शेफ) पदासाठी किमान इयत्ता दहावी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे.

ही भरती रॅली दि. २९ ऑगस्ट २०२६ ते ११ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत १ ईएमई सेंटर, सिकंदराबाद येथे आयोजित करण्यात येणार आहे.

भरती प्रक्रियेबाबतची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया व इतर सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी EME च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## औरंगाबाद जिल्हा वकील संघ निवडणूक : अध्यक्षपदाच्या मैदानात ॲड. नवीन विनोदकुमार अग्रवाल



**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद जिल्हा वकील संघाच्या सन २०२६–२७ च्या निवडणुकीत अध्यक्षपदासाठीची लढत चुरशीची होणार असून ॲड. नवीन विनोदकुमार अग्रवाल अध्यक्षपदाच्या मैदानात उतरले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या ५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशानंतर त्यांचे नाव अधिकृत उमेदवारांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी ॲड. जे. के. वसादीकर यांनी जाहीर केलेल्या अंतिम उमेदवारांच्या यादीत अध्यक्षपदासाठी ॲड. नवीन विनोदकुमार अग्रवाल यांच्यासह ॲड. संतोष गंगाधरराव चव्हाण, ॲड. अंकुश बापूराव जाधव आणि ॲड. मनोहर रामदास लोखंडे हे उमेदवार रिंगणात आहेत. ७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ३ वाजेदरम्यान मतदान होणार असून निवडणुकीची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. ॲड. अग्रवाल यांनी "आपला विश्वास, आमची बांधिलकी" हा संदेश देत वकील बांधवांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले आहे. संघटना अधिक सक्षम, पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याबरोबरच वकिलांच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे जिल्ह्यातील वकील बांधवांचे लक्ष लागले असून यंदाची निवडणूक चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत.

## जेजे प्लस हॉस्पिटलमध्ये 20 वर्षीय विद्यार्थ्याचे यशस्वी किडनी प्रत्यारोपण; मुलासाठी आईचे किडनीदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा, खान्देश आणि विदर्भातील रुग्णांसाठी विश्वासार्ह उपचार केंद्र म्हणून ओळख असलेल्या जेजे प्लस हॉस्पिटलमध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या वैद्यकीय परिस्थितीत २० वर्षीय विद्यार्थ्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरीत्या करण्यात आले. आपल्या मुलाला नवजीवन मिळावे यासाठी आईने स्वतःची किडनी दान करून मातृत्वाचा सर्वोच्च आदर्श घालून दिला.



गेल्या दीड वर्षांपासून संबंधित विद्यार्थी डायलिसिसवर होता. त्याची हृदयाची कार्यक्षमता कमी होती तसेच वारंवार गंभीर संसर्ग होत असल्याने प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक मानली जात होती. प्रत्यारोपणापूर्वी कार्डिओलॉजी, संसर्गरोग व नेफ्रोलॉजी विभागातील तज्ज्ञांनी संयुक्तपणे सर्व आवश्यक तपासण्या व उपचार पूर्ण केले. त्यानंतर सुमारे चार तास चाललेल्या शस्त्रक्रियेद्वारे किडनी प्रत्यारोपण यशस्वी करण्यात आले.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णावर अतिदक्षता विभागात विशेष देखरेख ठेवण्यात आली. नवीन किडनी उत्तम प्रकारे कार्यरत असून विद्यार्थ्याची प्रकृती स्थिर आहे. त्याला रुग्णालयातून रजा देण्यात आली असून सध्या आई आणि मुलगा दोघेही नियमित फॉलो-अपसाठी रुग्णालयात येत आहेत.

जेजे प्लस हॉस्पिटलचे संचालक व मेंदूविकारतज्ज्ञ डॉ. जीवन राजपूत यांनी यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल संपूर्ण वैद्यकीय पथकाचे अभिनंदन केले. "रुग्णाला केवळ उपचार नव्हे, तर नवजीवन देणे हेच जेजे प्लस हॉस्पिटलचे ध्येय आहे. अत्याधुनिक सुविधा, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि समर्पित वैद्यकीय पथकाच्या एकत्रित प्रयत्नातून अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वी होतात. अवयवदान ही सर्वोच्च मानवसेवा असून अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करून अनेकांना जीवनदान द्यावे," असे त्यांनी सांगितले.

नेफ्रोलॉजिस्ट डॉ. गौरी कुलकर्णी यांनी सांगितले की, कमी हृदय कार्यक्षमता आणि गंभीर संसर्गाचा इतिहास असलेल्या रुग्णाचे प्रत्यारोपण हे मोठे आव्हान होते. मात्र योग्य नियोजन, वेळेवर उपचार आणि विविध तज्ज्ञांच्या समन्वयातून हे यश मिळाले. त्यामुळे हा विद्यार्थी आता डायलिसिसमधून मुक्त होऊन पुन्हा शिक्षण सुरू करू शकणार आहे.

युरो सर्जन डॉ. शरद सोमानी आणि डॉ. अरुण चिंचोले यांनी सांगितले की, अशा उच्च-जोखमीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडणे ही जेजे प्लस हॉस्पिटलच्या वैद्यकीय क्षमतेची साक्ष आहे.

या प्रत्यारोपण प्रक्रियेत नेफ्रोलॉजिस्ट डॉ. गौरी कुलकर्णी, युरो सर्जन डॉ. शरद सोमानी, डॉ. अरुण चिंचोले तसेच आयसीयू, कार्डिओलॉजी, इन्फेक्शन कंट्रोल आणि नर्सिंग विभागाच्या संपूर्ण वैद्यकीय पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911